**राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत कृषि उत्पन बाजार समिती, कर्जत जि. अहमदनगर यांचे मुख्य बाजार आवार कर्जत व उपबाजार आवार राशीन व मिरजगाव येथील पणन विषयक पायाभूत सुविधा विकास प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः राकृवियो०६१९ /प्र.क्र. ९९ /२१-स**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २४ जून, २०१९

**वाचा :-**

१) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांचे पत्र क्र. मराकृमं/ प्रकल्प/ राकृवियो/ १८४७/२०१७ दि. १६.०९.२०१७.

२) शासन पत्र कृषि व पदुम विभाग क्र. RKV-१११७/CR ११/१४-A दि. ०२.०१.२०१८ रोजीचे पत्र

३) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांचे पत्र क्र. कृपमं/ अभि./ राकृवियो/ बा.स.कर्जत/८६७/२०१८ माहे एप्रिल, २०१८ चे पत्र.

प्रस्तावना :-

कृषि उत्पन्न बाजार समिती कर्जत, जि अहमदनगर यांच्या पणन विषयक पायाभूत सुविधा विकास प्रकल्पास राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या दिनांक १५/१२/२०१७ रोजीच्या २४ व्या बैठकीत मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत कृषि उत्पन बाजार समिती, कर्जत जि. अहमदनगर यांचे मुख्य बाजार आवार कर्जत व उपबाजार आवार राशीन व मिरजगाव येथील पणन विषयक पायाभूत सुविधा विकास प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

कृषि उत्पन्न बाजार समिती, कर्जत, जि. अहमदनगर यांनी सादर केलेल्या प्रकल्प अहवालाप्रमाणे त्यांच्या प्रकल्पाची किंमत रु. २४६.२३ लाख इतकी आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या दिनांक १५/१२/२०१७ रोजीच्या २४ व्या बैठकीत मंजूरी दिल्यानुसार कर्जत कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मंजूर प्रकल्पासाठी एकूण खर्च रु. २४६.२३ लाख येणार असून त्यापैकी राष्ट्रीय कृषि विकास योजने कडून २५ % अनुदान रु. ६१.५६ लाख मंजूर करण्यात आलेले आहे. या योजनेमध्ये वित्तीय संस्था / कृषि पणन मंडळाचे कर्ज ५३.०७% रु. १३०.२३ लाख व उर्वरित २१.९३ % निधी रु. ५४.०० लाख गुंतवणूक बाजार समिती स्वनिधीमधून करणार आहे. सबब, राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत कृषि उत्पन बाजार समिती, कर्जत जि. अहमदनगर यांचे मुख्य बाजार

आवार कर्जत व उपबाजार आवार राशीन व मिरजगाव येथील पणन विषयक पायाभूत सुविधा विकास प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना खालील अटी व शर्तीच्या अधीन शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता सर्वकष संनियंत्रण, मुल्यमापन व मार्गदर्शनाकरिता महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाची 'नोडल एजन्सी ' म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

२) या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीकरिता कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांची संनियंत्रण अधिकारी (Monitoring Officer) म्हणून नेमणूक करण्यात येत असून त्यांनी प्रकल्पाच्या कामाचे नियोजन करुन संबंधित बाजार समितीमार्फत प्रकल्पाची अंमलबजावणी विहीत कालावधीत पूर्ण करावी.

३) **सदर प्रकल्पाकरिता कर्जत बाजार समितीला उपरोक्त प्रकल्प किंमतीच्या २५% अनुदान राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून उपलब्ध करुन देण्यात येत असून बाजार समितीने २१.९३% निधी स्वनिधीतून गुंतवावयाचा आहे. बाजार समितीला आवश्यक असल्यास उर्वरित ५३.०७% निधी वित्तीय संस्था अथवा महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडून कर्ज घेवून उभारावा, तथापि सदर कर्जाचे दायित्व संपूर्णपणे संबंधित बाजार समितीचेच राहील.**

४) कृषि उत्पन्न बाजार समिती, कर्जत जि.अहमदनगर यांनी राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीपुढे मंजुरीसाठी सादर केलेल्या त्यांच्या मुख्य बाजार आवार कर्जत व उपबाजार आवार राशीन व मिरजगाव येथील पणन विषयक पायाभूत सुविधा विकास कामांच्या प्रकल्प घटकांना मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य यांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम १२ (१) अंतर्गत मान्यता दिली आहे. अधिनियमातील कलम १२ (१) अंतर्गत कर्जत बाजार समितीसाठी मंजूर केलेल्या सर्व प्रकल्प घटकांची उभारणी उपरोक्तप्रमाणे मंजूर वित्तीय आराखड्याच्या मर्यादेत राहूनच केली जाईल याची दक्षता संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीने घ्यावी. या व्यतिरिक्त एखादा अधिकचा प्रकल्प घटक घ्यावयाचा झाल्यास त्याचा संपूर्ण खर्च बाजार समितीने स्वनिधीतून आणि सक्षम प्राधिका-यांच्या परवानगीने व विहित पध्दतीनेच करावा. कसल्याही परिस्थितीत अशा जादाच्या खर्चासाठी शासनाकडून अथवा पणन मंडळाकडून रा.कृ.वि.यो. अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

५) कृषि उत्पन्न बाजार समिती, कर्जत जि. अहमदनगर यांनी त्यांच्या रा. कृ. वि. यो. अंतर्गत प्रकल्पाची सर्व मंजूर कामे ई-निविदा प्रक्रिया पद्धत राबवून पूर्ण करणे आवश्यक आहे.

६) कर्जत बाजार समितीकडून रा. कृ. वि. यो. अंतर्गत प्रकल्पाच्या कामांचे आदेश (Work Order) निर्गमित केल्यानंतर प्रत्यक्ष कामांना सुरुवात केलेनंतर संबंधित कंत्राटदाराकडून बाजार समितीकडे वेळोवेळी कामाची देयके सादर करण्यात येतील. सदर देयके आर्किटेक्ट कडून प्रमाणित करुन बाजार समितीला प्राप्त झालेनंतर ती बाजार समितीने आपल्या अभिप्रायांसहित कृषि पणन मंडळाच्या प्राधिकृत अभियंत्याकडे सादर करावीत. मंडळाच्या प्राधिकृत अभियंत्याने

सदर देयके तपासून मंजूरीच्या स्वयंस्पष्ट शिफारशीसहित ती त्वरीत पणन मंडळ मुख्यालयास सादर करावीत. प्राधिकृत अभियंत्याच्या शिफारशीप्रमाणे कर्जत बाजार समितीने देयकाची स्वनिधीतून २१.९३ % व कर्ज ५३.०७ % याप्रमाणे एकूण ७५ % इतकी रक्कम बाजार समिती स्तरावर कंत्राटदारास अदा करुन उर्वरीत देय २५ % अनुदान रक्कमेची  मागणी प्राधिकृत अभियंत्यांच्या शिफारशीने कृषि पणन मंडळाकडे करावी.

७) कर्जत बाजार समितीने विहित पद्धतीने सादर केलेले देयक कृषि पणन मंडळाने मुख्यालय स्तरावर प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १० कार्यालयीन दिवसांच्या आत तपासून मंजूर करावे व शासनाकडून अनुदान निधी प्राप्त होताच बाजार समितीला देयकापोटी देय २५ टक्के रा.कृ.वि.यो. अनुदान रक्कम तात्काळ RTGS अथवा तत्सम बँक सुविधेद्वारे बाजार समितीच्या खात्यावर अदा करावी. सदरची अनुदान रक्कम प्राप्त झाल्यानंतर बाजार समितीने ती ताबडतोब कंत्राटदार यांना अदा करणे बंधनकारक राहील.

८) या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता सर्वंकष संनियंत्रण, मुल्यमापन व मार्गदर्शनासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास 'नोडल एजन्सी ' म्हणून मंजूर प्रकल्प खर्चाच्या १ टक्के सेवा शुल्क देय राहील.

९) या प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये कोणतीही दिरंगाई होणार नाही तसेच या प्रकल्पाकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा विनियोग विहीत कालावधीत होईल याची दक्षता कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांनी घ्यावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०६२४१४५६०१९६०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KALU GONYA VALVI

Digitally signed by KALU GONYA VALVI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=714701fc3db9c38a46f4cd82e1e450b51a9e92eede8c323934f82edb538d3b20, postalCode=400032, street=MANTRALAYA , MUMBAI , serialNumber=8c5d0f275c3d9a21db07fecf7919c2d83796e88930d62d44e7a4a6d4cbee7e0e, ou=CO OPERATION MARKETING AND TEXTILE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KALU GONYA VALVI
Date: 2019.06.24 15:00:23 +05'30'

**( का. गो. वळवी )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. प्रधान सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

२. प्रधान सचिव, (कृषि),  कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

३. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे § ०१.
४. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे § ०१.
५. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे § ३७.
६. संचालक (नियोजन), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५.
७. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर
८. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, कर्जत जि. अहमदनगर.
९. निवड नस्ती